महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

**कालमर्यादा :**
**दि. २५.०८.२०२१ पूर्वी**

जा.क्र.तं.शि.विकापु/विवि/रॅगिंग ॲक्ट/२०२१/ 3650
दिनांक : 20 AUG 2021

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या
पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ बाबत ...**

संदर्भ :- १) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : १०/सनजीपी/रॅगिंग ॲक्ट/२०२१/ ६३८, दि.१८.०८.२०२१
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन पत्र क्रमांक : संकीर्ण-२०२१/प्र.क्र.११/विशि-४, दि २८.०७.२०२१

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र या विभागीय कार्यालयास प्राप्त झाले असून, सुलभ संदर्भासाठी सदर पत्रांच्या छायांकित प्रती या पत्रासोबत जोडल्या आहेत. महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थामध्ये रॅगिंग करणाऱ्या वर्तनाई करण्याकरीता, महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ हा दिनांक १५ मे १९९९ रोजी अंमलात आला आहे. सदर अधिनियमाची शैक्षणिक संस्थांमध्ये अंमलबजावणी करतांना नेमक्या कोणत्या प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. तसेच सदरहू अधिनियमांतर्गत आतापर्यंत किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत व त्या तक्रारींवर कोणत्या प्रकारची कारवाई झालेली आहे. याबाबतची सविस्तर माहिती तात्काळ शासनास उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी या पत्राव्दारे सर्व संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थांमध्ये सदर अधिनियमांतर्गत किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत ? व त्या तक्रारींवर कोणत्या प्रकारची कारवाई झालेली आहे ? तसेच या अधिनियमाची अंमलबजावणी करतांना नेमक्या कोणत्या अडचणी निर्माण होतात याबाबतची अभ्यासक्रमनिहाय सविस्तर व **बिनचूक माहिती दिलेल्या लिंकवर गुगल फॉर्ममध्ये <u>Google Marathi</u> चा वापर करुन, <u>दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ पूर्वी भरण्यात यावी,</u>** जेणेकरुन सदरची माहिती विहित मुदतीत संचालनालयामार्फत शासनास सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

सोबत : संदर्भिय पत्रांच्या छायांकित प्रती.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता .